

## इलेक्शनचा नाद खुळा



# ‘दादाचा वादा!’

## बघ... बघा.. बघा रे जिंकण्याचा खेळ बघा!!

जिंकण्याची असली ताकद तर स्व:बळाची हिम्मत दाखवा

अजित पवारांच्या सांगव्यानं पंचाईत

### रोज डायरी

## उमेदवारी अर्जाला आजपासून ‘मुहुर्त’

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील निमशहरांमधील ११ नगरपरिषद तसेच मोहोळ तालुक्यातील अनगर येथील नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक घोषित झाली आहे. त्यानुसार उमेदवार अर्ज भरण्याला आज सोमवार (ता.१०) पासून श्रीगणेशा होतोय. निवडणुकांमधील रणनिती केवळ भाजप आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षांनं घोषित केली आहे. भाजप स्व:बळावर लढणार आहे. तर भाजप वगळता कोणत्या पक्षासोबत युती करुन निवडणुका लढा असा आदेश शरद पवारांनी आपल्या पक्षाच्या संबंधितांना दिला आहे. या निवणुकांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबरपर्यत आहे. १८ तारखेला दाखल अर्जांवर छाननी, २१ नोव्हेंबर अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत, आक्षेपाच्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत २५ नोव्हेंबर २०२५ आहे.



# THE CURRENT UNDER CURRENT

✔ सोलापूर:

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पहिल्या टप्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांचं धूमशान आता सुरु झालंय. अनेक वर्षांनंतर या निवडणुका होत असल्यानं संबंधित सगळ्यांमध्येच नवचैतन्याचं वारं सळसळलंय. दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांसह मोहोळ तालुक्यातील अनगर नगपंचायतीची निवडणुकीसाठी प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज भरण्याला प्रारंभाला आता अवघे काही तासात उरलेत. मात्र निवडणुका लढण्यासंबंधीची भूमिका केवळ भाजपनं स्पष्ट जाहीर केली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील भाजप वगळता अन्य घटक पक्षांची भूमिका अद्याप गुलदस्त्यातच आहे. याच टप्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी मात्र स्थानिकच्या किंबहुना नगरपरिषदांच्या निवडणुकींचं चित्र क्लिअर स्पष्ट केल्याचं सांगण्यात आलं. राष्ट्रवादीच्या ‘घड्याळ’ चिन्हावर उमेदवार निवडून येतील, तिथेच स्व:बळावर लढण्यासाठी पॅनेल पर्यायानं नगराध्यक्षपदाचा उमेदवार उभा करा, असा त्यांनी सुचित केल्याची माहिती समोर आली आहे.

विशेषत्वे, जिंकण्याची ताकद नसताना उमेदवार उभे केल्यास पक्षाचं नुकसान तर होईलच, त्याशिवाय नामुष्की होईल, असंही अजित पवारांनी म्हटल्याची माहिती मिळाली आहे. अजित पवाराच्या या निरोपामुळं पक्षाचे नेते, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते चांगलेच कोड्यात पडले आहेत. जिल्ह्यातील नगरपरिषदांच्या ठिकाणी स्व:बळावर जिंकण्याची ताकद नसल्याने युती करुन लढायचं म्हटलं तर भाजपनं ‘अकेले हम’चा नारा दिला आहे. त्यामुळं शिंदे शिवसेनेसोबत युती करण्याचा पर्याय राष्ट्रवादींच्या पुढे शिल्लक आहे.

### ना पक्षाचा खासदार ना आमदार; जिल्हाध्यक्षाच्या नेतृत्वावर पॅनेल कसे?

अजित पवार राष्ट्रवादीनं सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे हे तगडे नेते दिले आहेत. त्याशिवाय उमेश पाटील यांच्यासारखा धडाकेबाज जिल्हाध्यक्ष आहे. मात्र या जिल्ह्यात या पक्षाचा आमदार, खासदार असं कोणीच नाही. त्याशिवाय नगरपरिषदेची निवडणूक लागलेल्या कोणत्याच शहरात पक्षाची मोठी ताकद नाही, ज्या ताकदीवर इथली निवडणूक स्व:बळावर लढताना पॅनेल आखाड्यात उतरवला येईल. केवळ जिल्हाध्यक्षाच्या नेतृत्वावर पॅनेल उभे कसे करणार? हा निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सवाल आहे.

### हुक्मी एक्का मोहोळची संधी गेली; भाजपच्या स्व:बळाच्या नाऱ्यामुळे अडचणी

‘स्थानिक’च्या निवडणुकांच्या तोंडावर माजी आमदार राजन पाटील यांनी भाजपात उडी घेतल्यानं अजित पवार राष्ट्रवादी गटाची मोहोळ तालुक्याची हुक्मी एक्का संधी गेली आहे. उमेश पाटील हे तिथं स्वतंत्र पॅनेल उभा करणार का हे बघावं लागेल. त्याशिवाय भाजपनं सर्वच ठिकाणी स्व:बळावर लढणं घोषित केल्यानं अजित पवार गटाच्या अडचणी वाढल्या आहेत. शिंदे शिवसेनेला सोबत घेऊन निवडणुका लढावाव्या लागतील.

### संजयमामांच्या काळजात अजितदादा; मग छातीठोकपणे सांगायला अडचण कसली?


अजित पवारांची घड्याळ चिन्हावर निवडणूक लढण्याची ऑफर झुगारुन करमाळा विधानसभेचा आखाडा लढलेले माजी आमदार संजयमामा शिंदे हे अजित पवार गटाचं काम करताहेत म्हणे. दरम्यान असं असेल तर करमाळा नगरपरिषद अजित पवार गटाकडून लढण्यासंदर्भात माढ्याच्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत लक्ष घालण्याला पर्यायानं भूमिका जाहीर करण्याला त्यांना अडवण काय? असा प्रश्न या पक्षाच्या निष्ठावंताचा आहे.



## क्या सच क्या झूठ?

## आमदार ‘खरे’ खरोखरच परिचारकांच्या तुंबूत जाणार?

पंढरपूर नगरपरिषदेसह या तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा राडा उठला आहे. सध्या नगराध्यक्ष पदांसह सदस्य पदांसाठी चेहरे निवडण्याला पडद्याआतून गती येतानाच, परिचारक गटाच्या पाडुरंग परिवाला निवडणुकांमध्ये नामोहरण करण्यासाठी विस्कटलेला विठ्ठल परिवार एकत्र आला आहे. या परिवाराच्या नेतेमंडळींनी सर्वपक्षीय आघाडी तयार केली आहे. या आघाडीच्या अनेक बैंठका झाल्या मात्र त्यांना आमदार राजू खरे उपस्थित राहिलेले नाहीत. त्यावरुन त्यांची भूमिका मात्र अद्याप गुलदस्त्याच राहात आहे. मात्र विधानसभेच्या निवडणुकीत आमदार अभिजित पाटील तसेच कल्याणराव काळे, भगिरथ भालके या पैकी कोण्याच नेत्यांचे सहकार्य लाभले नाही. त्यामुळं सर्वपक्षीय आघाडीला समर्थन देण्याला खरे यांच्या समर्थकांचा कडवा विरोध आहे. त्यामुळे समर्थकांच्या भूमिकेची बूज राखून ते परिचारक गटासोबत जातील. मात्र यामध्ये खरे काय आणि खोटे काय? हे लवकर कळेल.



## ‘औलाद’ काढली डॉक्टर वाघानं; महायुतीत भूकंप झाला रागानं!




✔ धाराशिव :

माजी मंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत यांचा सडेतोड आणि फटकळ स्वभाव तसा उभ्या महाराष्ट्राला परिचित. ‘सावंत बोले अन् वादग्रस्त विधान ठरे’ असं आजवरचं जणू काही समीकरण. तानाशाहींचे बोल म्हणजे वाद निर्माण होतोच होतो. त्याच्या ठिकऱ्या सर्वदूर पसरतातच हे सर्वश्रुत. तानाशाहींचे असेच वादग्रस्त बोल धाराशिव जिल्ह्यात निघाले. त्यानं महायुतीत जणू काही भूकंप तर झालाच झाला.पण महायुतीमध्ये अंतर्गत तणाव असल्याचं लपून राहिलं नाही. प्रा.डॉ. सावंतांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर आगपाखड करताना त्यांच्या स्वाभिमानाला ‘दे धक्का’ करत थेट औलाद काढली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे वातावरण तापलं असताना राष्ट्रवादीच्या धोरणावर आणि त्यांच्या कामांवर नाराजी व्यक्त करत सावंतांनी टीकास्त्र डागलं.

‘युतीची तत्त्व माहीत नाही तर कशासाठी युती करता. दोन्ही राष्ट्रवादी एकच आहेत मी सांगत होतो’ अशा शब्दात तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर तोफ डागली.दोन्ही राष्ट्रवादी एकच आहेत वेगवेगळ्या नाहीत. याचा प्रत्यय तुम्हाला गेल्या महिन्याभरात आला असेल. कुणाला पटो अगर न पटो माझी मतं आहेत ती आहेत, असं सावंत यांनी म्हटलं.

### अजितदादा म्हणाले...

शिवसेना नेते तानाजी सावंत यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले, विनाशकाले विपरीत बुद्धी. आम्हाला काही बोलायचे नाही. आम्ही सुसंस्कृत म्हणून राज्यात राजकारण करतो. अशा शब्दांत अजित पवारांनी आरोपांच्या राजकारणावर नाराजी व्यक्त केली.



## मेंबर होण्यासाठी कायपण!

## साहेब, फक्त एकबार...‘बारबार’नाही







✔ सोलापूर :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतर्गत पहिल्या टप्यात सोलापूर जिल्ह्यातील अकरा शहरांमध्ये इथल्या नगरपरिषदेच्या निवडणुकांसह मोहोळ तालुक्यातील अनगरच्या नगपंचायतीची निवडणूक लागली आहे. २ डिसेंबर २०२५ ला प्रत्यक्ष लोकशाहीचा उत्सव साजरा होणार असून प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबली जाणार आहे. त्या अनुषंगाने, आज १० नोव्हेंबर २०२५ पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याला श्रीगणेश होत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत १७ नोव्हेंब आहे.

दरम्यान या टप्यावर पक्षाची किंवा गटाची अधिकृत उमेदवारी मिळवण्यासाठी निवडणुकीच्या बोहल्यावर चढलेल्या इच्छुकांकडून गॉडफादरांची मनधरणी सुरु आहे. ‘कोणत्याही परिस्थितीत या खेपेस मलाच उमेदवार द्या, इतरांच्या तुलनेत मीच सक्षम आहे, माझ्यावर एवढीबार मेहरबानी दाखवा, तुमच्या शब्दाबाहेर नाही, तुम्ही म्हणाल ते ऐकतो, मी तुमच्यावेळी मदत केली, आता मला मदत करा, तुम्ही मनावर घेतलं तर मी मेंबर होऊ शकतो, बघा एकवेळ’ या आणि अशा शब्दात सोलापूर आणि माढ्याचे खासदार तसेच ‘त्या’ ‘त्या’ तालुक्याचे आमदार, तालुकास्तरावरील विविध पक्षाचे अध्यक्ष, पक्षाचे बडे पदाधिकारी यांच्याकडे इच्छुकांकडून गळ घातली जात आहे. उमेदवारीसाठी संबंधितांच्या पायावर लोटांगणसुद्धा घातलं जात आहे. इच्छुकांची संख्या जादा असल्यानं उमेदवारीला एवढं महत्त्व आलंय.




## डॉ. प्रणितांच्या बाजूने मिळेल का कौल? उमेदवारीचा चेंडू सुप्रियताईंच्या कोर्टात!






मुंबई : बहुचर्चित पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठीची निवडणूक ‘बिग फाईट’ होईल, हे लपून राहिलेलं नाही. या पदासाठी बड्या पक्षाची उमेदवारी मिळण्यासाठी ज्या मोठ्या हालचाली चालू आहेत, यावरुन हे सिद्ध होत आहे. सर्वसाधारण महिला आरक्षणाच्या या जागेवर डॉ.प्रणिता भालके या निवडणूक लढण्यासाठी सज्ज आहेत. त्यांच्या उमेदवारीचा विषय रविवार (ता.९) मुंबईत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैंठकीत आमदार अभिजित पाटील यांनी काढला. डॉ.प्रणिता यांना उमेदवारी देण्यासंदर्भातील विषय पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळेंसह श्रेष्ठींच्या कोर्टात आहे. राष्ट्रवादी सोडून काँग्रेसमध्ये गेलेल्या भालके परिवाराला आता नगराध्यक्षपदाची संधी देताना आमदारकीच्या निवडणुकीवेळी घातलेला घाव राष्ट्रवादी विसरणार नाही, असं सांगितलं जातंय. त्यामुळं डॉ.प्रणितांच्या बाजूनं उमेदवारीचा कौल मिळणार का? हे पाहणं औत्सुक्याचं आहे.

## “राजन पाटलांना दाखवाचेय् ‘वर्चस्वाची’ची किंमत; उज्वलाताईंना दाखवाचेय् रणरागिणीची हिंमत!”






✔ सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतीची पहिली-वहिली निवडणूक अत्यंत वेगळ्या वळणावर जाण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. भाजपमध्ये नुकताच प्रवेश केलेल्या माजी आमदार राजन पाटील परिवाराला होमपीच अनगर नगरपंचायतीची निवडणूक भाजपच्या नेतृत्वाखाली बिनविरोध करुन महाराष्ट्रभरात हवा उडवून देत ‘मालक’ म्हणून अनगर परिसरात असलेलं निर्विवाद वर्चस्व पर्यायानं ताकद दाखवून द्यायची असावी. तर दुसऱ्या बाजूला चक्क गावबंदी करण्यासह शेती, घर-दार, मुलाचं शिक्षण असं सर्वस्व उद्धवस्त केलेली रणरागिणी उज्वला थिटे-पाटील यांना इथली नगरपंचायतीची निवडणूक लावून आपली हिंमत दाखवून द्यायची असावी.

विशेषत्वे, अनगरमधील आजवरच्या एकधिकारशाहीला गाढण्यासाठी राजन पाटील विरोधक इथल्या नगरपंचायतीची निवडणूक लावण्यसाठी खटाटोप करीत असावेत. ‘वारं फिरलंय’ याची साक्ष पटवून देत बिनविरोध निवडीची ६८ वर्षांची पंरपरा मोडित काढायची आहे, त्यादृष्टीने अनगर पाटील यांच्या विरुद्ध आमदारकीला रान उठवलेल्या उज्वला थिटे-पाटील यांच्या पाठिशी विरोध ताकद लावू शकतात.

### अनगर नगरपंचायत निवडणुकीचा विषय मुंबापुरीत; राष्ट्रवादी की शिंदे सेनेचा उमेदवार असणार आखाड्यात?

अनगर नगरपंचायत निवडणूक लढण्यासंबंधीचा विषय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कोर्टात गेला आहे. तर दुसरीकडं शिंदे सेनादेखील इथली निवडणूक लढण्यासाठी चाचपणी करीत आहे. या पक्षाच्या एका मंत्र्यांकडे यासंबंधीची बैंठक झाल्याचं कळतं. वास्तविक पाहता इथली बिनविरोध निवडीची परंपरा खंडित होऊ द्यायची नाही, म्हणून लोकनेते परिवाराची धडपडेल तर कोणत्याही परिस्थितीत इथं निवडणूक लावायची, याचा चंग विरोधक बांधतील यातून इथल्या निवडणुकीचा संघर्ष पराकोटीला जाईल,‘जितना बडा संघर्ष, जित उतनी शानदार’चा इथं प्रत्यय येऊ शकतो.